वर्ष- ३२ वे | अंक- ३६ वा | पाने- ४ | किंमत-रू.२/-

साप्ताहिक मुळशी दिनांक

मुख्य संपादक-स्व.दत्तात्रय सुर्वे

प्रति,

दि - २० - २६ एप्रिल २०२५

- कार्यकारी संपादक -
श्री. केतन दत्तात्रय सुर्वे

KD'S GROUP
Realty | Redevelopment Consultant | Enterprises | Marketing
* We are Dealing in Sale, Purchase & Renting of Commercial Shop, Showroom, Space, Café, Hotel, Restaurant & Bar and Plots..
* Sole Selling & Marketing of New Building & Plots
: kdsrealtygroup : 7263002400

Postal Reg. No.PCW/119/2019-2021, Posted at Ex.servicemen Colony,Post Office. RNI No. MAHMAR/2003/9449. Publication Day-Sunday. Posting Day-Thursday

# क्रीडासह अनेक क्षेत्रात महाराष्ट्राकडून देशाचे नेतृत्व:राज्यपाल;शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचे वितरण

पुणे : महाराष्ट्राने उद्योग, शिक्षण, सामाजिक सुधारणा तसेच क्रीडा क्षेत्रातही देशाचे नेतृत्व केले आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी होण्यासाठी मुलांना लहान वयापासूनच विविध क्रिडाप्रकारांमध्ये सहभागी होण्या साठी प्रोत्साहन द्यावे लागेल, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार २०२२- २३ व २०२३-२४ वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पणनमंत्री जयकुमार रावल, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, प्रशांत बंब, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, क्रीडा व युवक सेवा आयुक्त हिरालाल सोनवणे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार आदी उपस्थित होते.



या कार्यक्रमात सन २०२२- २३ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू प्रदीप गंधे यांना तर सन २०२३ -२४ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार माजी राष्ट्रीय कबड्डीपटू,संघटक शकुंतला खटावकर यांना वितरित करण्यात आला.

शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कारप्राप्त खेळाडू शकुंतला खटावकर आणि प्रदीप गंधे यांचे विशेष अभिनंदन करतानाच सर्व पुरस्कार प्राप्त खेळाडूंचे अभिनंदन करून राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन म्हणाले, आज खेळ हे तांत्रिकदृष्ट्या तसेच शारीरिकदृष्ट्या अत्यंत स्पर्धात्मक झाले आहेत. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, आशियाई तसेच ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धां अशा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धां मध्ये यशस्वी होण्यासाठी आपल्या मुलांना खूप लहान वयापासूनच खेळां मध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे लागेल. शाळा आणि पालकांनी मुलांना खेळ आणि स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

विविध क्रीडाप्रकारांमध्ये अनेक मुली पुढे येत विविध स्पर्धांमध्ये पदके मिळवत असल्याचा आनंद आहे. गेल्या काही वर्षात आपल्या दिव्यांग खेळाडूंनी ही राष्ट्रीय आणि आंतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. भविष्यात सर्व क्रीडा प्रकारात आपण वर्चस्व गाजवू असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुंबई, पुण्यासारख्या महानगरांमध्ये खुल्या जागांची कमतरता आहे तिथे शाळा आणि महाविद्यालये विद्यार्थ्यांना खेळाच्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी स्थानिक मैदाने आणि क्रीडा क्लब यांच्यासोबत सहयोग करू शकतात, आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात क्रीडा संकुले स्थापन करण्यात आली असून क्रीडा सुविधांमध्ये वाढ करण्यात येत आहे, असेही श्री.राधाकृष्णन यांनी नमूद केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धा भारतात व्हाव्यात यासाठी प्रयत्न करीत असून महाराष्ट्राने आपल्या खेळाडूंना ऑलिम्पिक साठी तयार करण्यास पुढाकार घ्यावा, 'विकसित भारत' बाबत चर्चा करत असतानाच आपण ऑलिंपिकमध्येही सर्वाधिक पदके मिळविण्याबाबतही विचार केला पाहिजे. आपले खेळाडू त्यात यशस्वी होतील असा आशा वादही राज्यपालांनी व्यक्त केला.

शिवछत्रपतींचे नाव या पुरस्काराच्या माध्यमातून खेळाडूंच्या नावासोबत लागत आहे, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ही आपण केलेल्या मेहनतीला एक प्रकारची राज मान्यता आहे. हा पुरस्कारप्राप्त खेळाडू, प्रशिक्षक, भूतपूर्व खेळाडू आदी सर्वांनीच आपली भूमिका ठरवून खेळाच्या आणि खेळाडूंच्या विकासासाठी आपले पूर्ण योगदान देण्याची मानसिकता बाळगावी.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, सर्वच पुरस्कारार्थींनी त्यांच्या खेळावरील प्रेम, मेहनत आणि क्रीडा कौशल्याने क्रीडा क्षेत्राचा आणि देशाचा गौरव वाढविला आहे.

कार्यक्रमात राज्यातील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये चमकदार काम गिरी केलेल्या खेळाडू, संघटक, प्रशिक्षकांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यामध्ये जीवन गौरव पुरस्कार,दिव्यांग खेळाडू पुरस्कार, खेळाडू पुरस्कार, थेट पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक-जिजा माता पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, साहसी क्रीडा पुरस्कार असे सन २०२२- २३ चे ७० आणि सन २०२३-२४ च्या ८९ याप्रमाणे एकूण १५९ पुरस्कार प्रदान करण्यात आले. समारंभास पुरस्कारार्थी खेळाडू, खेळाडूंचे पालक आदी उपस्थित होते.

# राज्याच्या उत्पादनक्षमतेत भर घालणारी रस्त्यांची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत: सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

पुणे (प्रतिनिधी): औद्योगिक क्षेत्रे, विमानतळ,बंदरे,पर्यटनस्थळे आदींना जोडणाऱ्या आणि राज्याच्या उत्पादन क्षमतेत वाढ होईल अशा प्रकारे रस्त्यांच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरवून कामे हाती घ्यावीत, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

सार्वजनिक बांधकाम पुणे प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता अतुल चव्हाण,पुणे मंडळाचे अधीक्षक अभियंता बाप्पा बहीर, सोलापूर मंडळाचे एस.एस.माळी, सातारा मंडळाचे एस.बी.रोकडे, कोल्हापूर मंडळाचे तुषार बुरुड, दक्षता व गुण नियंत्रण मंडळाचे अधीक्षक अभियंता सुरेंद्र कंकरेज यांच्यासह विभागातील कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

राज्यात औद्योगिक गुंतवणूक, परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणात व्हावी यासाठी राज्यशासन मोठ्या प्रमाणात काम करीत आहे, असे सांगून मंत्री श्री.भोसले म्हणाले, राज्याच्या प्रगतीला गती देण्यासाठी रस्त्यांचे जाळे वाढणे महत्त्वाचे असते. त्यादृष्टीने प्राधान्यक्रम ठरवून नवनवीन रस्ते प्रकल्प हाती घ्यायचे आहेत. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमानुसार रस्ते, इमारतींच्या कामांचे लक्ष्य गाठतानाच त्यांची गुणवत्ता, अधिकार क्षेत्रातील इमारतींची स्वच्छता, व्यवसायस्नेही



वातावरण निर्मिती आदींवर लक्ष द्यावे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत टप्याटप्याने काम हाती घ्यावयाचे आहे, या किल्ल्यांना रस्त्यांची जोडणी करायची असून पर्यटक अधिक काळ तेथे थांबतील यादृष्टीने पायाभूत सुविधा व आकर्षणकेंद्रे निर्माण कशी करता येतील याबाबत अभ्यास करावा. पर्यटन हा मोठा रोजगार देणारा उद्योग असून राज्यात या क्षेत्राच्या विकासाला मोठा वाव आहे. त्यासाठी महत्त्वाची पर्यटनस्थळे मोठ्या रस्त्यांनी जोडणे आवश्यक असून त्या दृष्टीने नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

रस्ते, सार्वजनिक इमारतींची कामे करताना त्यांच्या दर्जाला सर्वाधिक महत्त्व द्यावे. त्यासाठी नियमित संनियंत्रण करावे. रस्त्यांच्या कडेला, इमारतील वृक्षारोपणासाठी येथील हवामानात वाढणाऱ्या स्थानिक प्रजातींना महत्त्व द्यावे. सातारा जिल्ह्यातून महाबळेश्वर येथे आणि कोकणात जाताना वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पर्यायी मार्गाचे सर्वेक्षण करावे, असे निर्देशही श्री.भोसले यांनी दिले.

यावेळी मुख्य अभियंता श्री.चव्हाण यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे विभागाचा आढावा दिला.रस्त्यांचे खड्डे असल्यास त्याची माहिती विभागाला कळविण्यासाठी 'पॉथहोल कंप्लेंट रिड्रेसल सिस्टीम (पीसीआर एस)' हे मोबाईल ॲप तयार करण्यात आले तसेच भारत सरकारच्या एमसेवा पोर्टलवरदेखील ते उपलब्ध करण्यात आल्याचे सांगितले.

बैठकीदरम्यान छत्रपती संभाजी महाराज यांचे वढू येथील समाधीस्थळ आणि तुळापूर बलिदान स्थळ विकास आराखड्यातील कामांचे चित्रफीती द्वारे सादरीकरण करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सद्यस्थितीत 'हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल अर्थात हॅम', आशियाई विकास बँक (एडीबी), नाबार्ड, केंद्रीय मार्ग निधी योजना तसेच अर्थसंकल्पित निधीतून सुरू असलेली रस्ते,पुलांची कामे,भविष्यातील नियोजन, सुरु असलेल्या इमारतींची कामे, नाविन्यपूर्ण योजना आदीं बाबतही यावेळी सादरीकरण करण्यात आले.

पुणे शहरातील तसेच शिक्रापूर, चाकण तळेगाव रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने प्रस्तावित महत्त्वाकांक्षी असा शिरूर-खेड-कर्जत-पनवेल रस्ता तसेच लोणावळा येथे प्रस्तावित सार्वजनिक बांधकाम प्रशिक्षण व संशोधन प्रबोधिनीबाबत सादरीकरण करण्यात आले.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा



पुणे (प्रतिनिधी): जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत २०२४-२५ वर्षीच्या कामकाजांचा आणि सन २०२५-२६ या वर्षात करण्यात येणाऱ्या काम काजाबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आढावा घेतला.

जिल्हाधिकारी श्री.डूडी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा वार्षिक योजना आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डूडी म्हणाले, मागील आर्थिक वर्षात सर्व यंत्रनांनी नियोजनबद्ध काम केल्यामुळे शंभर टक्के खर्चाचा उद्दिष्ट साध्य झाले, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील सुरू असलेली कामे ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करायची असून, २०२५-२६ या आर्थिक वर्षातील कामांसाठी ३१ मे २०२५ पर्यंत सर्व मान्यतांची प्रक्रिया पूर्ण करुन, ही कामे डिसेंबर २०२५ पर्यंत कामाची गुणवत्ता राखून पूर्ण करावीत, अशा सूचना त्यांनी संबंधित यंत्रणाना दिल्या. डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२६ या तीन महिन्यात करायची आहे. काही कामांची तपासणी करण्यात येईल. नाविन्य पूर्ण योजनेतंर्गत प्रत्येक विभागाने एक प्रस्ताव नियोजन विभागास सादर करावा यात नाविन्यपूर्ण कामांचा समावेश असावा असे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद श्री.पाटील म्हणाले, जिल्हा परिषद अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील प्रलंबित कामांचे आदेश ३१ मे २०२५ पूर्वी देऊन कामे तात्काळ पूर्ण करावीत. बैठकीला संबंधित विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# रिझर्व्ह बँके रेपो दर:दिलासा आणि धक्काही

रिझर्व्ह बँकेने रेपो दरात पुन्हा पाव टक्क्याने कपात करून चालू वर्षात सलग दुसऱ्यांदा कर्जदारांना दिलासा दिला आहे. महागाई आटोक्यात असताना वाढीला चालना देणे हा या उदार धोरणामागील हेतू दिसतो. गेल्या दोन वर्षांत उच्च पातळीवर असणारे व्याजदर आता हळूहळू घसरण्याची शक्यता आहे, असा याचा दुसरा अर्थ. हा निर्णय कर्जदारांसाठी चांगला असला, तरी पारंपरिक मुदत ठेवींच्या (एफडी) उत्पन्नावर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्यांच्या पथ्यावर पडणारा नाही. त्यांच्यासाठी ही धोक्याची घंटा ठरू शकते. वास्तविक, महागाई आटोक्यात ठेवायची की विकासाला गती द्यायची, हा पेच सध्या जगभरात आहे.

येत्या काही तिमाहींमध्ये रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या मर्यादेत महागाई राहिली, तर व्याजदरात आणखी कपातीची शक्यता नाकारता येत नाही. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी व्याजदराची घोषणा करतानाच एकूण देशांतर्गत उत्पन्नावर (जीडीपी) केलेले भाष्य महत्त्वपूर्ण आहे. सध्याचा काळ जागतिक अनिश्चिततेचा असल्याने त्याचा फटका बसून, चालू आर्थिक वर्षात निव्वळ 'जीडीपी' ६.५ टक्के राहण्याची शक्यता असल्याचे नियामकांचे म्हणणे आहे. आधीचा हा अंदाज ६.७ टक्क्यांचा होता. 'जीडीपी'वाढीचा दर कमी होण्यामागे मुख्यतः धोरणात्मक बदल आणि जागतिक व्यापारातील वाढती जोखीम ही प्रमुख कारणे असून, जागतिक बाजारपेठेतील अस्थिर हालचालींमुळे ही अनिश्चितता काही काळ टिकून राहण्याची शक्यता दिसते. त्यामुळेही देशाच्या वाढीला खीळ बसू शकते.

या पार्श्वभूमीवर उत्पादन क्षेत्र पुन्हा मूळ पदावर येत असून, गुंतवणुकीतही वाढ झाली आहे. याशिवाय शहरी ग्राहकांचे खर्चाचे प्रमाण वाढत असल्याने देशांतर्गत मागणी बळकट होत आहे. अलीकडच्या काही महिन्यांत किरकोळ महागाई दरात घट झाली आहे. अन्नधान्याच्या किमतीत झालेल्या लक्षणीय घसरणीमुळे जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये किमती स्थिर ठेवण्यात मदत झाल्याचे रिझर्व्ह बँकेचे निरीक्षण आहे. अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्धामुळे जागतिक मंदीचा धोका असून, आर्थिक वाढ मंदावल्यास कमोडिटी आणि कच्च्या तेलाच्या किमती आणखी घसरू शकतात.

संभाव्य व्यापारयुद्धामुळे जागतिक विकासाला खीळ बसण्याचे संकेत असून, त्याचाही फटका देशांतर्गत विकासाला बसण्याची भीती आहे. एकंदरीत व्याजदर कमी झाल्याने नव्याने कर्जे घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ होण्याची चिन्हे असून आधीच कर्ज घेतलेल्या ग्राहकांना आणि उद्योगांना दिलासा मिळेल, हे निश्चित. मात्र, ठेवींवरील व्याजदरही कमी होणार असल्याने ठेवीदारांना फटका बसण्याची शक्यता आहे.

# मदन शेलार यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार




माण (प्रतिनिधी) : ग्रामविकास विभागाच्या वतीने यशवंत पंचायत राज अभियानांतर्गत सन २०२३-२४ या वर्षासाठी घोषित करण्यात आलेल्या आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी पुणे जिल्ह्यातून माण (ता.मुळशी) ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी मदन हरिभाऊ शेलार यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या शिफारशी वरून शासनाने ही निवड केली आहे.

शेलार हे मूळचे भोर तालुक्यातील असून, पुणे जिल्हा ग्रामसेवक पतसंस्थेचे संचालक म्हणूनही ते कार्यरत आहेत. ग्रामविकासाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या शेलार यांना यापूर्वी पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील हागणदारीमुक्त गाव, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि कोविड काळातील कामगिरी साठी आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

माण ग्रामपंचायतीमध्ये त्यांनी कार्यभार स्वीकारल्यापासून गावात जलशुद्धीकरण प्रकल्प, सांडपाण्याचे शुद्धीकरण, महिला बचत गट सक्षमीकरण, युवक व महिलांसाठी प्रशिक्षण आदी उपक्रम प्रभावीपणे राबवले आहेत. यासोबतच त्यांनी नवोदित कुस्तीपटूंसाठी आधुनिक व्यायामशाळेची उभारणी केली असून, सध्या ६० हून अधिक खेळाडू येथे नियमित सराव करत आहेत.

स्वतः कुस्तीगीर असलेल्या शेलार यांनी शासकीय सेवेत दाखल होण्यापूर्वी अनेक कुस्ती आखाड्यां मध्ये आपली छाप उमटवली आहे. त्यांची सेवाभावी वृत्ती आणि विकासासाठीचा झपाटलेपणा पाहून जिल्हा परिषदेच्या वतीने राज्य शासनाकडे त्यांच्या नावाची शिफारस करण्यात आली होती.

मुंबईत होणाऱ्या विशेष समारंभात ग्रामविकास मंत्री यांच्या हस्ते शेलार यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

आदर्श ग्रामविकास अधिकारी म्हणून मदन शेलार यांची निवड झाल्यानंतर ग्रामपंचायत माण ग्रामपंचायतीच्या वतीने शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन शेलार यांचा गौरव करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसह माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य संदीप साठे, उद्योजक सचिन आढाव, माजी सदस्य तानाजी पारखी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी बोलताना शेलार म्हणाले, "गावाच्या विकासासाठी मिळालेला हा पुरस्कार माझा नाही, तर संपूर्ण माण ग्राम पंचायतीच्या टीमचा सन्मान आहे भविष्यातही हे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवणार आहे."

या सत्कार कार्यक्रमाने ग्रामस्थां मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, गावाचा नाव राज्य पातळीवर उजळवणाऱ्या शेलार यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.


मदन शेलार

# संत तुकाराम साखर कारखानाच्या अध्यक्षपदी नानासाहेब नवले


नानासाहेब नवले


अनिल लोंखडे

हिंजवडी (प्रतिनिधी): मुळशी मावळ, खेड, हवेली, शिरूर अशा पाच तालुक्याचे कार्यक्षेत्र असलेल्या कासरसाईतील श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार विदुरा तथा नानासाहेब नवले यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष खेड तालुक्यातील मरकळ गटातून निवडून आलेले संचालक अनिल लोंखडे यांची बिनविरोध वर्णी लागली.

कारखान्याच्या २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कार्यकाळासाठी संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच पार पडली. त्यानंतर सर्वपक्षीय नेते मंडळी कडून ठरल्याप्रमाणे कारखान्याच्या अध्यक्षपदी नवले यांच्या नावाची यापूर्वीच घोषणा करण्यात आली होती. परंतु उपाध्यक्ष पदी कोणाची वर्णी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर बुधवारी (दि.१६) निवडणूक निर्णय अधिकारी मुकूंद पवार यांच्या अध्यक्षेते खाली कारखाना सभागृहात दोन्ही पदांसाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी नवले व लोंखडे यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी पवार यांनी त्यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा केली. निवडीनंतर चेतन भुजबळ यांनी प्रास्ताविक करत नवनिर्वाचित मान्यवरांचा स्वागत सत्कार केला.

यावेळी मावळते उपाध्यक्ष बापुसाहेब भेगडे, माऊली दाभाडे, चेतन भुजबळ, दत्तात्रय जाधव, धैर्यशील ढमाले, यशवंत गायकवाड, दत्तात्रय उभे, संदीप काशिद, छबुराव कडू, भरत लिम्हण, उमेश बोडके, विलास कातोरे, अतुल काळजे, धोंडीबा भोंडवे, लक्ष्मण भालेराव, राजेंद्र कुदळे, शिवाजी कोळेकर, संचालिका ज्योती अरगडे, शोभा वाघोले, कार्यकारी संचालक साहेबराव पठारे आदी उपस्थित होते. या प्रक्रियेसाठी उपमुख्यमंत्री तथा सुरेश घुले यांनी सर्वपक्षीय समन्वयक म्हणून भूमिका पार पाडली.

*शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणार-

निवडीनंतर अध्यक्ष नानासाहेब नवले व उपाध्यक्ष अनिल लोंखडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्यातील सर्वपक्षीय प्रमुख नेते, आमदार, खासदार तसेच सर्व संचालक मंडळ, शेतकरी सभासदांचे आभार मानले. यावेळी संत तुकाराम महाराजांच्या आशीर्वादाने कारखाना हे एक कुटूंब असून त्याप्रमाणे सर्वांना विश्वासात व बरोबर घेऊन कारखान्याच्या किंबहुना शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणार असल्याचे नवले यांनी सांगितले.

# रोकडेश्वर हनुमान जयंतीनिमित्त घोटवडे गावात रंगला कुस्तीचा थरार



पिरंगुट(प्रतिनिधी): रोकडेश्वर हनुमान जयंतीच्या निमित्ताने घोटवडे गावात पार पडलेल्या कुस्ती आखाड्याने प्रेक्षकांच्या मनात ठसा उमटवला असून, या आखाड्याने 'घोटवडे पॅटर्न' नावाने एक नवा आदर्श उभा केला आहे. शनिवारी १३ एप्रिल रोकडेश्वर मंदिरापासून कुस्तीला प्रारंभ झाला. ज्यांनी कुस्त्या पुरस्कृत केल्या, त्या ग्रामस्थांचा सन्मानाचा फेटा घालून मिरवणूक काढण्यात आली आणि पुढे मैदानात दिमाखात प्रवेश करण्यात आला.

या भव्य आखाड्यात एकूण ६२ कुस्त्या पार पडल्या. यामध्ये ४८ कुस्त्या चितपट, १२ गुणांच्या आधारे आणि ३ महिला कुस्त्या विशेष आकर्षण ठरल्या. मैदानात एकसंध आणि नियोजनबद्ध वातावरण होते. कुठेही गोंधळ किंवा गडबड न होता एक शिस्तबद्ध आखाडा अनुभवास आला.

या आखाड्यात सुमारे पंधरा लाख पंधरा हजार रुपये इतकी बक्षिसांची रक्कम पैलवानांना देण्यात आली. काही प्रेक्षणीय विजयांनी प्रेक्षकांची वाहवा मिळवली. पै. ओंकार दगडे, रामा कांबळे, सुजय तनपुरे, साहिल मोहोळ या पैलवानांनी आपल्या ताकदीची झलक दाखवली. शेवटची आणि बहुचर्चित कुस्ती भारत मदने विरुद्ध शुभम सिंधनाळे यांच्यात रंगली. ही कुस्ती अत्यंत चुरशीची ठरली आणि अखेर बरोबरीत सोडण्यात आली.

या संपूर्ण आयोजनामध्ये घोटवडे गावातील आजी-माजी पैलवान, ग्रामस्थ, युवक मंडळींनी एकत्र येऊन आखाड्याचे अचूक नियोजन केले. हा आखाडा आणि त्यामागील घोटवडे पॅटर्न इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरेल असे आयोजकांनी सांगितले.

'घोटवडे पॅटर्न' म्हणजे काय?

पंच म्हणून आजी-माजी पैलवानांना संधी देण्यात आली. निवेदकाचा माईक सुरू असताना व्यासपीठावर माईक बंद ठेवण्यात येत होता, ज्यामुळे मैदानातील आवाज स्पष्टपणे ऐकू येत होता. ज्यांनी कुस्ती पुरस्कृत केली, त्यांच्याच हस्ते ती कुस्ती लावण्यात आली. प्रायोजकांचे नाव माईकवर न घेता, पैलवानांच्या हातात थेट रोख रक्कम देण्यात आली. सर्व कार्यक्रम गोंधळमुक्त व अत्यंत सुस्थितीत पार पडला.


## ग्रामपंचायत मांदेडे,ता.मुळशी,जि.पुणे

### बी १ जाहिर निविदा नोटीस क्र.१ सन २०२५-२०२६

**ग्रामपंचायत मांदेडे,ता.मुळशी,जि.पुणे** हे खालील कामांच्या सीलबंद निविदा हे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील (वर्ग १ ते ७ ) नोंदणीकृत ठेकेदाराकडुन निवीदा मागवित आहे. मोहरबंद निविदा अर्ज दिनांक २१/०४/२०२५ ते २८/०४/२०२५ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत ग्रा.पं.मांदेडे, ता.मुळशी जि.पुणे येथे स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी संध्याकाळी ५.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा फी | बयाणा रक्कम | कामची मुदत | नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मांदेडे माळवाडी रस्ता कॉंक्रिट करणे. | ८,४९,९९९/- | ५९०/- | सूट | ३ महिने | जि.प.सु.वे अभियंता |
| २ | मांदेडे येथे सांडपाणी व्यवस्थापन करणे. | २,९८,९४८/- | २७०/- | सूट | ३ महिने | जि.प.सु.वे अभियंता |
| ३ | मांदेडे येथे सार्वजनिक स्वौचलय बांधणे | २,९९,९९९/- | २७०/- | सूट | ३ महिने | जि.प.सु.वे अभियंता |

टिपः- १. कोणतीही निविदा अर्ज स्विकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. २. कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी ) ग्रामपंचायत मांदेडे येथे रोख जमा करणेत यावी कोरे टेंडर फॉर्म ग्रां.प. कार्यालय येथे उपलब्ध होतील. ३. इसारा रककम भरणेस सुट असलेस सुटीचे प्रमाणपत्र जोड़नेत यावे. ४. ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी दाखला जी. एस. टी प्रमानपत्र व पॅन कार्ड अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत मांदेडे, ता.मुळशी,जि.पुणे

सही/-
**सरपंच**
ग्रामपंचायत मांदेडे,ता.मुळशी,जि.पुणे

# खारावडे म्हसोबा देवाच्या गाभाऱ्यात ६२ किलो चांदीची महिरप



पिरंगुट (प्रतिनिधी) : खारावडे येथील श्री म्हसोबा देवस्थानाच्या गाभाऱ्यात तब्बल ६२ किलो चांदीची महिरप बसविण्यात आली आहे. ही महिरप भक्त संतोष भाडळे यांच्या श्रध्देचा आणि भक्तीचा एक अद्वितीय नमुना ठरत आहे.

या महिरपेचे विधीवत पूजन व अर्पण कोल्हापूर येथील करवीर पीठाचे श्री जगद्गुरु शंकराचार्य विद्यानृसिंहभारती आणि भाऊ महाराज परांडे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

देवस्थानच्या अध्यक्षा सौ.मधुरा भेलके यांनी दिलेल्या माहितीनुसार, म्हसोबा देवस्थानला नुकताच 'ब' दर्जाचा तीर्थस्थळ म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे ट्रस्टकडून मंदिर परिसराचे सुशोभीकरण तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दररोज येथे येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय वाढत असून, देवते साठी चढविण्यात येणाऱ्या दानातही विविधता आढळून येते. काही भाविक रोख रक्कम अर्पण करतात,तर काहीजन सोनं,चांदी,मौल्यवान दागदागिने देतात.

संतोष भाडळे यांनी अर्पण केलेली ही चांदीची महिरप भाविकांमध्ये आकर्षणाचे केंद्र ठरत असून, श्रद्धेचा एक अनोखा सोहळा म्हणून ती पाहिली जात आहे.

# ग्रामपंचायत आंदेशे,ता.मुळशी,जि.पुणे

## बी १ जाहिर निविदा नोटीस क्र.१ सन २०२५-२०२६

**ग्रामपंचायत आंदेशे,ता.मुळशी,जि.पुणे** हे खालील कामांच्या सीलबंद निविदा हे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील (वर्ग १ ते ७) नोंदणीकृत ठेकेदाराकडुन निवीदा मागवित आहे. मोहरबंद निविदा अर्ज दिनांक १७/०४/२०२५ ते २८/०४/२०२५ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत ग्रा.प आंदेशे ता.मुळशी जि.पुणे येथे स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी संध्याकाळी ५.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | बयाणा रक्कम | कामची मुदत | नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंदेशे दीप नगर येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. (२०% जि.प. समाजकल्यान निधी) | ८,५०,०००/- | ५९०/- | सूट | ६ महिने | सर्वसाधारण वर्ग |

**टिप:-**
१. कोणतीही निविदा अर्ज स्विकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे.
२. कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी ) ग्रामपंचायत आंदेशे येथे रोख जमा करणेत यावी कोरे टेंडर फॉर्म ग्रां.प. कार्यालय येथे उपलब्ध होतील.
३. इसारा रककम भरणेस सुट असलेस सुटीचे प्रमाणपत्र जोडनेत यावे.
४. ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी दाखला जी. एस. टी प्रमानपत्र व पॅन कार्ड अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत आंदेशे, ता.मुळशी,जि.पुणे

सही/-
**सरपंच**
ग्रामपंचायत आंदेशे,ता.मुळशी,जि.पुणे

**जाहीर बी — १ निविदा सुचना क्र. १/२०२५-२०२६**
**पंचायत समिती मुळशी, बांधकाम उपविभाग मुळशी**

बांधकाम उपविभाग मुळशीच्या वतीने उपअभियंता बांधकाम उपविभाग मुळशी पौड यांचे तर्फे खालील कामांचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे बांधकाम उपविभाग मुळशी कडील योग्य त्या कंत्राटदाराकडून खाली नमुद कामाच्या सिलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. को-या निविदेचा नमुना उपअभियंता जि.प.बांधकाम उपविभाग मुळशी यांच्या कर्यालयातुन दि.२१/०४/२०२५ सकाळी १०.०० वा पासून ते दि.२९/०४/२०२५ (सुटटीचे दिवस सोडून ) दु.४.०० वा पर्यंत देणेत येतील.सिलबंद भरलेल्या निविदा उपअभियंता बांधकाम उपविभाग मुळशी येथे दि.२२/०४/२०२५ ते दि.३०/०४/२०२५ रोजी दु. ५.०० पर्यंत स्विकारणेत येतील आणि शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यानंतर कार्यालयीन सोईच्या दिवशी समक्ष समितीसमोर उघडणेत येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी रु. | इसारा रक्कम रु. | एकूण अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | आवश्यक कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अकोले येथील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ३,३८,१५०/- | ५९०/- | १.०० ०/० | २.०० ०/० | ३ | वर्ग १ ते ८ |
| २ | अकोले अंतर्गत चव्हाणनगर जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २,११,२१६/- | २७०/- | १.०० ०/० | २.०० ०/० | ३ | वर्ग १ ते ८ |

१. निविदा संचासाठी अर्जासोबत उपरोक्त कामाचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे योग्य त्या वर्गाचे नांदणी प्रमाणपत्र , मुळ प्रति दाखविलेनांतर त्यांना कोरे निविदा संचासाठी भरणा चलन तयार करुन देणेत येईल.
२. को-या बी — १ नमुन्याची रक्कम रोख स्वरुपात चलनाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक, शाखा पौड खाते क्रमांक. २६/१ येथे भरुन चलन दाखविल्यास को-या निविदा उपलब्ध होतील .
३. सिलबंद निविदेच्या लिफाफा क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या स्वत: साक्षांकित केलेल्या प्रती सादर कराव्या लागतील.
(अ) जि.प.कडील कंत्राटदार अदयावत नोंदणी प्रमाणपत्र .
(आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत.
(इ) इसारा रकमेचा गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पं.स.मुळशी , जि.प.निधी खाते क्र.२६/१ या नावाने काढणेत आलेला धनादेश D D (बयाणा रक्कम सुट प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही) तसेच सु.बे.अ. व म.स.स. यांनीही खुल्या गटातील निविदा असल्याने बयाणा रक्कम भरणे बंधणकारक आहे.
(ई) प्राप्तीकर पॅन कार्ड .
(उ) जी.एस.टी प्रमाणपत्र .
( टिप :- उपरोक्त कागदपत्रांपैकी एकही कागदपत्र सादर केलेले नसल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल व आर्थिक लिफाफा (Financial Bid) उघडणेत येणार नाही. तसेच कोणतेही कागदपत्र सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.)
४. सीलबंद निविदेच्या लिफाफा क्र. २ मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वत:चा सही शिक्का असलेला तसेच दर अंकी व अक्षरी लिहीलेला खात्याने साक्षांकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.
५. अ) पात्र निविदा धारकांकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करतेवेळी यांचे नावे ठेव पावती स्वरुपात / चलनाने रोख स्वरुपात घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम प्रथम देयकातून कपात केली जाईल.
ब) Insurance towards laber isconsidersd in rate abstract of DSR item=The contractor shall produce the labour insurance policy, else following amount will be deducted from his first R A Bill. १.००% .
६. (अ) निविदाधारकाचा देकार निविदाधिन कामाच्या किमतीनेक्षा १०% पेक्षा अधिक दराने असेल तर एवढया दरात कामाचा दर्जा योग्य राखून काम कसे पुर्ण याबाबतचा सविस्तर लेखी तपशील स्वाक्षरीसह लिफाफा क्र. २ मध्ये विहित ठिकाणी स्कॅन करुन सादर करावा अन्यथा निविदा अवैदय समजणेत येईल.
(ब) निविदाधारकाचा देकार निविदाधिन कामाच्या किमतीपेक्षा १ ते १० % पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किमतीच्या १ % एवढया रकमेचा पुणे येथे देय असलेला खाते क्र. २६/१ या नावाने काढलेलानिविदा प्रसिध्दीचे दिनांकानंतरच्या तारखेचा धनाकर्ष (Demand Draft) परॉमन्स सिक्युरिटी म्हणमन लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावा .निविदा देकार १ % पर्यत कमी असल्यास अतिरीक्त सुरक्षा अनामत भरण्याची आवश्यकता नाही.(उदा. १ ते १०.०० % पर्यंत कमी दर १ % रक्कम.)
(इ) निविदा प्रपत्रातील व निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीत राखून ठेवला असून निविदा पाठविण-या कोणत्याही व्यक्तीला / संस्थेला निविदा फेटाळल्याबददल स्पष्टीकरण मागता येणार नाही.
(ड) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १.०१% पासून ते १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किमतीच्या १ % एवढया रकमेचा गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पं.स.मुळशी जि.प.निधी खाते. क्र.२६/१ या नावाने काढलेला निविदा प्रसिध्दीच्या दिनांकानंतरच्या तारखेचा एकत्रीत धनादेश (डी.डी.) (Demand Draft) जो लघुत्तम निविदा धारक आसेल त्यानेच निविदा उघडलेपासून ८ दिवसाचे आत कार्यालयात जमा करावा.

उपअभियंता
बांधकाम उपविभाग मुळशी

गटविकास अधिकारी
पंचायत समिती मुळशी

# मुळशीतील शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई तातडीने द्या;शिवसेनेची मागणी



पौड (प्रतिनिधी): मुळशी तालुक्यात अवकाळी पावसासह वादळी वाऱ्याने झालेल्या शेतीच्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तर्फे तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले.

जिल्हाप्रमुख प्रकाश भेगडे आणि तालुकाप्रमुख सचिन खैरे यांच्या नेत्त्वाखालील शिष्टमंडळाने नायब तहसीलदार श्रीकांत मिसाळ यांच्या कडे हे निवेदन सादर केले. मुळशी तालुक्यात अनेक गावांमध्ये वणवे लागल्याने फळबागांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, याचीही भरपाई शेतकऱ्यांना देण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यासंदर्भात तालुक्याचे तहसीलदार रणजीत भोसले यांनी शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने लवकरात लवकर मदत मिळेल, असे आश्वासन दिले.

या प्रसंगी मुळशी तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी राम गायकवाड, तालुका संघटक हनुमंत सुर्वे, दत्ता गोरे, ॲड. धनंजय टेमघरे, काळूराम गोडांबे, प्रदीप कालेकर, दत्तात्रय देवकर, सिताराम फाले, आबा रणवरे आदी उपस्थित होते.

# ढेबे वस्तीचा वीजप्रश्न लवकरच मार्गी लागणार



लवसा (प्रतिनिधी): मोसे (ता. मुळशी) खोऱ्यातील पाथरशेत येथील बें भटमाळ ढेबे वस्तीवरील वीजप्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे. वस्ती अंधारात असल्याची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासन आणि लोक प्रतिनिधी सतर्क झाले. खासदार सुप्रिया सुळे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील महावितरण कंपनीच्या (महाराष्ट्र वीज वितरण कंपनी) कार्यालयात महत्त्व पूर्ण बैठक झाली.

बैठकीस महाराष्ट्र प्रदेश अभियंता राजेंद्र पवार,कंपनीचे अधिकारी, तसेच मुळशी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) चे अध्यक्ष महादेव कोंढरे उपस्थित होते.

पळसे-पाथरशेत येथील बेंभट माळ ढेबे वस्तीवरील वीज प्रश्न वर चर्चा झाली. महादेव कोंढरे, व सरपंच नितीन ढेबे यांनी अधिकाऱ्यांकडे विद्युतपुरवठा सुरळीत करण्यासाठी मागणी करण्यात आली. या वेळी एनएससी योजने अंतर्गत वीजपुरवठा करण्यात येईल, असे आश्वासन घुले व पवार या अधिकाऱ्यांनी दिले.

दरम्यान, उपोषणात असतानाही खासदार सुप्रिया सुळे यांनी अधिकाऱ्यांशी थेट फोनवरून संपर्क साधून वस्तीवर तातडीने वीज देण्याचे स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीला सरपंच नितीन ढेबे, पोलीस पाटील भगवान, ढेबे, धोंडिबा ढेबे, बबन ढेबे, ज्ञानेश्वर ढेबे, तसेच दासवेचे माजी सरपंच शशिकांत मोरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# ग्रामपंचायत जवळ, ता.मुळशी, जि.पुणे

## बी १ निविदाअंतर्गत निविदा सूचना क्र.१ सन २०२५-२६

**ग्रामपंचायत जवळ,ता.मुळशी,जि.पुणे** हे यांच्यातर्फे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद पुणे यांच्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडुन तीन लिफाफा पध्दतीने खालील कामांची सिलबंद निविदा ठेकेदारांकडून ३ पाकीट पध्दतीने निवीदा मागविण्यात येत आहे. कोऱ्या निवीदांचा नमुना ग्रामपंचायत जवळ, ता.मुळशी जि.पुणे यांच्या कडून दि.२१/०४/२०२५ ते दि.२८/०४/२०२५ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत देण्यात येईल व भरून पाठविलेल्या मोहरबंद निवीदा दि.२१/०४/२०२५ ते दि.२८/०४/२०२५ पर्यंत सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय जवळ येथे स्वीकारल्या जातील व शक्य झालेस त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | इसरा रक्कम रुपये | कोऱ्या निविदा किंमत रुपये | काम पूर्ण करावयाचा कालावधी महिने |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे जवळ येथील वस्तीमध्ये नळ पाणी पुरवठा कनेक्शन देणे. (१५वा वित्त आयोग) | २,३७,८२०/- | १% | २९०/- | ३ महिने |
| २ | मौजे जवळ येथील जि.प शाळा नळ पाणी पुरवठा दुरुस्ती करणे. (१५वा वित्त आयोग) | ५१,०५६/- | १% | २९०/- | ३ महिने |

**टिप:-**
१) कोणत्याही निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत. २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रांपंचायत कार्यालायत भरून निविदा उपलब्ध करून घ्याव्यात. ३) कोरी निविदा मागणी अर्जासोबत ठेकेदाराचा प्रमाणित नोंदणी दाखला जोडावा लागेल. ४) मूल्यांकन (एम.बी) पुर्ततेनंतरच देयक अदा केले जाईल.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत जवळ,
ता.मुळशी, जि.पुणे

सही/-
**प्रशासक**
ग्रामपंचायत जवळ,
ता.मुळशी, जि.पुणे

Decl.no.:- SDM/PUNE/SR/489/2021
Contact :- 9765626828 / 9372111575
महाराष्ट्र राज्य शासन मान्य.. जाहिरात यादीवरील साप्ताहिक
METRO Pune
मुळशी दिनांक
दि. २० - २६ एप्रिल २०२५


साप्ता.मुळशी दिनांक आणि पाक्षिक शिवतेज चे न्यूज वेब पॉर्टल..
शिवतेज न्यूज (Shivtej News) रोज वाचा.. नियमित वाचा.. जगभर वाचा.. www.shivtejnews.in

## ग्रामपंचायत वळणे,ता.मुळशी,जि.पुणे

### बी १ जाहिर निविदा नोटीस क्र.१ सन २०२५-२०२६


**ग्रामपंचायत वळणे, ता.मुळशी, जि.पुणे** हे खालील कामांच्या सीलबंद निविदा हे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील (वर्ग १ ते ७ ) नोंदणीकृत ठेकेदाराकडुन निवीदा मागवित आहे. मोहरबंद निविदा अर्ज दिनांक १७/०४/२०२५ ते २८/०४/२०२५ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत ग्रा.पं.वळणे,ता.मुळशी जि.पुणे येथे स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी संध्याकाळी ५.०० वाजता उघडण्यात येतिल.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा फी | बयाणा रक्कम | कामची मुदत | नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वळणे आंबेडकरनगर समाज मंदीर दुरुस्ती अंतर्गत मागास वर्गीय समाजमंदीरामधील ग्रंथालय दुरुस्ती करणे. | ९९,९९१/- | ५९०/- | सूट | ६ महिने | सर्वसाधारण वर्ग |
| २ | वळणे आंबेडकर नगर आर.सी.सी. पाणी पुरवठा टाकी व दुरुस्ती करणे. (२०% जि.प.समाजकल्यान निधी) | ८,००,०००/- | ५९०/- | सूट | ६ महिने | सर्वसाधारण वर्ग |

टिपः- १. कोणतीही निविदा अर्ज स्विकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे.
२. कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी ) ग्रामपंचायत वळणे येथे रोख जमा करणेत यावी कोरे टेंडर फॉर्म ग्रां.प. कार्यालय येथे उपलब्ध होतील. ३. इसारा रककम भरणेस सुट असलेस सुटीचे प्रमाणपत्र जोड़नेत यावे.
४. ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी दाखला जी. एस. टी प्रमानपत्र व पॅन कार्ड अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत वळणे, ता.मुळशी,जि.पुणे

सही/-
**सरपंच**
ग्रामपंचायत वळणे,ता.मुळशी,जि.पुणे




## कोथरूड ग्रामदैवत म्हातोबाच्या मूळ ठिकाणी जाणे झाले अधिक सुकर



कोथरूड (प्रतिनिधी): कोथरूडचे ग्रामदैवत श्री म्हातोबाचे मूळ ठिकाण असलेल्या एआरआय टेकडीवरील मंदिराकडे जाणे अधिक सुकर झाले आहे. ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकारातून सदर मंदिराकडे जाणा ऱ्या पायऱ्यांची पुनर्बांधणी करण्यात आली असून, त्यामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कोथरूडचे ग्रामदैवत श्री म्हातोबा यांचे एआरआय टेकडीवरील मूळ ठाणे असून, मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यां ची अतिशय दुरवस्था झाली होती. सदर पायऱ्या अतिशय जीर्ण आणि भग्न झाल्याने मंदिरात दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना मोठी कसरत करावी लागत होती. सदर पायऱ्यांची पुनर्बांधणी करुन;दर्शनासाठी जाणा ऱ्या भाविकांची व्यवस्था व्हावी; अशी ग्रामस्थांची सातत्याने मागणी होती.

त्यामुळे ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी पुढाकार घेत; या पायऱ्यांची पुनर्बांधणी केली असून; घडीव दगडी पायऱ्या बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे मंदिर परिसराचे वैभव देखील वाढले असून; दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नामदार चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की मंदिर हे सामाजिक ऐक्य आणि संस्कारांचं केंद्र आहे. त्यामुळे तिथे होणाऱ्या एकत्रि करणातून सामाजिक ऐक्य जपले जाते. राज्याचा सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना; अनेक मार्ग उभारले. पण मी लहानपणा पासून ज्या देवस्थानात जायचो; त्या कोल्हापूरमधील तळे माऊली मंदिराकडे जाणारा मार्ग तयार केला.

ते पुढे म्हणाले की,कोथरुड मतदारसंघातील म्हातोबाचे मूळ ठिकाण असलेल्या एआरआय टेकडीवरील मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यांची पुनर्बांधणी करण्याची मागणी सातत्याने होत होती. त्या मुळे हे काम करुन; म्हातोबांच्या चरणी अर्पण करतो. भविष्यात ही या परिसराच्या विकासासाठी एकात्मिक आराखडा तयार करावा ;त्वासाठी आमदार निधीतून निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही यावेळी दिली. दरम्यान, नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढा काराबद्दल म्हातोबा सेवक संघा च्या वतीने समाधान व्यक्त केले.

## सोनिया गांधी व राहुल गांधी वरील ईडीची कारवाई राजकीय सुडबुद्धीनेच: अरविंद शिंदे



पुणे (प्रतिनिधी): केंद्रातील भाजपचे नरेंद्र मोदी सरकार काँग्रेस नेत्या खा. सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्यावर सक्त वसुली संचालनालयामार्फत (ईडी) दबाव आणून लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. या अन्याया विरोधात पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे अध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालया जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, पुणे येथे आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना अध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले की, ''मोदी शासनाने द्वेष पूर्ण भावनेतून व सूडबुद्धीने नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राची मालमत्ता मन मानी पध्दतीने जप्त केली. तसेच खा. सोनिया गांधी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी व इतर ज्येष्ठ नेतेमंडळी विरूध्द सत्तेचा दुरूपयोग करून कोर्टामध्ये चार्जशीट दाखल करण्याचा मोदी सर कारचा निर्णय हा लोकशाही परंपरेला घातक आहे. अन्यायकारक नीया च्या विरूध्द आम्ही लक्षा देण्याचे ठरविले आहे. नॅशनल हेरॉल्ड प्रकरणामध्ये मुद्दामून नाव बदनाम करून खोट्या गुन्ह्यात अटक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या विरोधात काँग्रेस कार्यकर्त्यांच्या तीव्र भावना असून पक्षाचा कार्यकर्ता कदापी शांत राह णार नाही, या विरोधात रस्त्यावर उतरून मोदी सरकारचा खरा चेहरा लोकांसमोर आणण्याचे काम काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते येथून पुढे करतील मोदी सरकारने चूकीच्या पध्दतीने राहुलजी गांधी यांना अटक करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही शांत बसणार नाही. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरून निषेध नोंदविला जाईल.

यावेळी माजी गृहराज्य मंत्री रमेश बागवे, प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, वीरेंद्र किराड, संजय बालगुडे, मुख्तार शेख, गोपाळ तिवारी, नगरसेवक अजित दरेकर, रफिक शेख, अविनाश बागवे, मेहबुब नदाफ, कैलास गायकवाड, प्राची दुधाने, स्वाती शिंदे, प्रियंका रणपिसे, अनिता धिमधिमे, प्रियंका मधाळे, कांचन बालनायक, सुंदर ओव्हाळ, ॲड. राजश्री अडसूळ, शिवानी माने, उषा राजगुरू, ज्योती परदेशी, शारदा वीर, ब्लॉक अध्यक्ष सुजित यादव आदींसह असंख्य काँग्रेस कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादीका श्रीमती.विनिता दत्तात्रय सुर्वे यांनी **श्री समर्थ प्रिंटर्स**, ६८० बुधवार पेठ, पुणे-४११००२(दूर-०२०-२९९५०६१५) येथे छापून,१०/६४,पी.एम.सी. कॉलनी,शास्त्रीनगर,पौड रोड,कोथरूड,पुणे-४११०३८ येथे प्रसिध्द केले.दूर-९७६५६२६८२८,८२०८२६०४७१,या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांशी,मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही .पुणे न्यायालयीन कक्षेत-**संपादक,पिंपरीचिंचवड कार्यालय**-द्वारा-श्री.संतोष मुरलीधर माचुत्रे,शिवनेरी निवास,केशवनगर,प्लॉट नं.४,विवेक वसाहत,चिंचवडगाव,पुणे-४११०१८
Email-mulshidinank@gmail.com, mulshidinank@rediffmail.com, dattasurve27@gmail.com | No.SDM/PUNE/SR/489/2021 **कार्यकारी संपादक-श्री.केतन दत्तात्रय सुर्वे**